आकाशवाणी नागपूर,
प्रादेशिक बातम्या (मराठी–वेळ सायंकाळी ०६.००)
शनिवार, दिनांक ०६ एप्रिल २०२४

ठळक बातम्या

1. भारताच्या न्यायिक क्षेत्रात महिला वकिलांचे वाढते प्रमाण ही अभिमानाची बाब भारताचे सरन्यायाधीश डॉ.धनंजय चंद्रचूड यांचे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या शतकोत्तर उत्सवाप्रसंगी प्रतिपादन.

2. महाराष्ट्र लोकसेवा आयोग लवकरच सुधारित परिक्षांच्या तारखा जाहीर करणार.

3. भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिवस आज पक्षाच्यावतीने विविध उपक्रमाद्वारे साजरा; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नागपुरातील कार्यक्रमात संबोधन.

4. नागपूरच्या कस्तुरचंद पार्कवर मतदान जनजागृती धडा रचण्याचा विक्रम स्थापित; 8 हजार मतदारांनी नोंदविला सहभाग.

*****

नागपूर खंडपीठ शतकोत्तर समारंभ

भारताच्या न्यायिक क्षेत्रांमध्ये महिलांचे प्रमाण वाढणे ही अभिमानास्पद गोष्ट असून गेल्या दहा वर्षांमध्ये अनेक महिला वकील या उच्च न्यायालयामध्ये दाखल झाल्या आहेत. आपण स्वतः एकाच वेळी 11 महिला वकीलांना सुप्रीम कोर्ट मध्ये वरिष्ठ अधिवक्ता -सीनीयर एडवोकेट म्हणून मान्यता दिली होती. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये देखील 3000 सदस्यापैकी 500 सदस्य या महिला आहेत ही खूप अभिमानास्पद गोष्ट आहे असे प्रतिपादन भारताचे सरन्यायाधीश डॉ.धनंजय चंद्रचूड यांनी काल मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाच्या शतकोत्तर समारंभाप्रसंगी डॉ.वसंतराव देशपांडे सहभागृहात आयोजित कार्यक्रमाला संबोधित करताना केले. या प्रसंगी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती न्यायमूर्ती भूषण गवई, भारताचे माजी सरन्यायाधीश शरद बोबडे, नागपूर उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचे प्रशासकीय न्यायमूर्ती नितीन सांबरे प्रामुख्याने उपस्थित होते. नागपूर मध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी बुद्ध धम्माचा स्वीकार केला त्यांचे स्मारक दीक्षाभूमी येथे आहे, तसेच शांतीवन चिंचोली येथे बाबासाहेबांच्या स्मृती जतन करून ठेवले आहेत. डॉ.बाबासाहेबांनी आपल्या कायद्याच्या प्रॅक्टिसला जेव्हा सुरुवात केली होती त्याचेही हे शतकपूर्ती वर्ष आहे. याच अनुषंगाने दिल्लीमध्ये बाबासाहेबांचा एक पुतळा सर्वोच्च न्यायालयात आपल्याच हस्ते बसवण्यात आला. त्यामुळे नागपूरचा एक पार्ट आता सर्वोच्च न्यायालयात सदैव राहील असेही न्यायमूर्ती चंद्रचूड यांनी सांगितले. उच्च न्यायालयाच्या नागपूर बार असोशिएनने न्यायमूर्ती एम हिदायतुल्लाह आणि न्यायमूर्ती शरद बोबडे हे दोन भारताचे सरन्यायाधीश दिले त्याचप्रमाणे कायदा क्षेत्रातील अनेक मात्तबर व्यक्तीमत्व दिले असेही सरन्यायाधीश न्यायमुर्ती चंद्रचूड यांनी स्पष्ट केले.

कुठल्याही बार असोसिएशनचे भूमिका ही न्यायालयामध्ये न्यायप्रक्रियेला सामान्य माणसाला सहज बनवण्याची असावी. सर्वोच्च न्यायालयाने वकिलावर होणाऱ्या हल्ल्याबाबत नुकतीच एक सुओमोटो याचिका दाखल केली आहे असे सुद्धा धनंजय चंद्रचूड यांनी नमुद केले. यावेळी त्यांनी नागपूर हायकोर्ट बार असोसिएशन तर्फे चालवल्या जाणाऱ्या 'न्याय दूत' या विदर्भातील ग्रामीण क्षेत्रातील याचिकाकर्त्यांना निशुल्क न्यायिक सहायता या उपक्रमाचे कौतुकही केले. कुठल्याही संस्थेसाठी शतकपूर्ती महोत्सव हा एक महत्त्वाचा क्षण असतो असे सांगतानाच सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जस्टीस भूषण गवई यांनी आपण आज जे काही आहोत ते हायकोर्ट बार असोसिएशन नागपूरमुळे आहोत असे प्रतिपादन यावेळी केले. याप्रसंगी नागपूर बार असोसिएशनचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

<u>महाराष्ट्र लोकसेवा आयोग</u>

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षण निश्चिती करून लवकरच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या सुधारित परिक्षांच्या तारखा जाहीर करण्यात येणार असल्याचे आयोगाने कळविले आहे. राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ मधील तरतुदीनुसार दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ पूर्वी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत,जाहिरात प्रसिद्ध होऊन अर्ज मागविण्यात आलेले असून निवड प्रक्रिया सुरु झालेली नाही, अशा प्रकरणी शासनाकडून सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरिता आरक्षण विचारात घेऊन नव्याने आरक्षण निश्चिती करून घेणे गरजेचे आहे व त्याप्रमाणे मागणीपत्र पाठविण्याबाबत शासनाच्या सर्व संबंधित प्रशासकीय विभागांना कळविण्यात आले आहे. विविध संवर्गातील एकूण २७४ पदांकरीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. ही परीक्षा दिनांक २८ एप्रिल, २०२४ रोजी घेण्यात येणार होती. परंतु, महाराष्ट्र राज्यातील सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाकरीता आरक्षण अधिनियम, २०२४, दिनांक २६ फेब्रुवारी, २०२४ अंमलात आल्याने या अधिनियमातील तरतुदी विचारात घेता आयोगाच्या २१ मार्च, २०२४ रोजीच्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे महाराष्ट्र राजपत्रित नागरी सेवा संयुक्त पूर्व परीक्षा २०२४ तसेच दिनांक १९ मे, २०२४ रोजी नियोजित समाज कल्याण अधिकारी, गट-ब आणि इतर मागास बहुजन कल्याण अधिकारी, गट-ब या परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. सुधारित मागणीपत्र आयोगास प्राप्त होण्यास किती कालावधी लागेल याबाबत निश्चितता नसल्याने सध्या परिक्षेची सुधारित तारीख जाहीर करता येत नाही. प्रस्तुत परीक्षेतील सर्व संवर्गाकिरिता प्रशासकीय विभागाकडून सुधारित मागणीपत्र प्राप्त झाल्यानंतर परिक्षेच्या पूर्व तयारीकरिता पुरेसा कालावधी देऊन तसेच संघ लोकसेवा आयोग व कर्मचारी चयन आयोग इत्यादींमार्फत

आयोजित स्पर्धा परीक्षेचे दिनांक विचारात घेऊन परिक्षेचा सुधारित दिनांक आयोगामार्फत जाहीर करण्यात येईल.

‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण अकोला लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

रमजान

मुस्लिम धर्मीयांसाठी पवित्र असलेल्या रमजान महिन्यातील शब-ए-कद्र आज साजरी करण्यात येणार आहे. यानिमित्तानं सर्व मशिदींमध्ये आज रात्रभर नमाज अदा केली जाते. शहरातल्या प्रसिद्ध मशिदीत विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलेलं आहे, तसंच इतर मशिदींमध्येही प्रार्थना केली जाणार आहे.

पक्षस्थापना दिन

भाजपा आज ४४ वा स्थापना दिन साजरा करत आहे. यानिमित्त भाजपाचे ज्येष्ठ नेते आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी पक्ष कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. गेली अनेक वर्ष कठोर परिश्रम, संघर्ष आणि त्यागातून पक्षाची उभारणी केलेल्या कार्यकर्त्यांचे आभार मानत असल्याचं त्यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा अविभाज्य घटक असल्याबद्दल भाजपाला अभिमान वाटत असून ही भागीदारी आणखी दृढ व्हावी, असंही त्यांनी म्हटलं आहे. भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शाह आणि अध्यक्ष जे.पी.नड्डा यांनीही सर्व कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे कल्याणचे विद्यमान खासदार डॉ.श्रीकांत शिंदे हेच महायुतीचे उमेदवार असतील त्यांच्या पाठीशी महायुतीतील सर्व घटक पक्ष भाजपा सहित यांना मताधिक्याने निवडून आणतील असे भाजपचे नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. भाजपा पक्ष स्थापना दिनानिमित्त नागपुरात आयोजित कार्यक्रमात संबोधित केल्यानंतर पत्रकार पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. भारतीय जनता पक्ष हा देशातातील सर्वात मोठा सदस्य असलेला त्याचप्रमाणे सर्वात जास्त स्थानिक लोकप्रतिनिधी आणि

आमदार असणारा पक्ष आहे. या पक्षात कधीच फूट पडली नाही कारण या पक्षाचे कार्यकर्ते हे आत्मकेंद्रीत नाही असं त्यांनी पक्षस्थापना दिनाप्रसंगी संबोधित करताना सांगितलं.

<u>मतदान जनजागृती धडा</u>

नागपूर महानगरपालिका, नागपूर जिल्हाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आज सकाळी शनिवार रोजी नागपूरच्या कस्तुरचंद मैदानावर-जगातील सर्वात मोठा मतदान जनजागृती धडा रचण्याचा एक विक्रम स्थापन केला आहे. एलिट वर्ल्ड रेकॉर्ड आणि इंडियन रेकॉर्ड **अॅ**कॅडमीने या विक्रमाची घोषणा केली. महापालिका आयुक्त डॉ.अभिजीत चौधरी, जिल्हाधिकारी डॉ.विपिन इटनकर आणि सिस्टिमेटिक व्होटर्स एज्यूकेशन अँड इलेक्ट्रॉल पार्टीसिपेशन अर्थात ‘स्वीप’ अभियानाच्या प्रभारी जिल्ह परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी सौम्या शर्मा यांना यावेळी शिल्ड आणि प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी 8 हजाराहून अधिक मतदार या क्षणाचे साक्षीदार झाले. याप्रसंगी 'अधिकार है' या मतदान जनजागृती संदर्भातील एका गाण्याचे लोकार्पण सुद्धा करण्यात आले. निवडणूक निर्णय अधिकारी आणि नागपूरचे जिल्हाधिकारी डॉ.विपन इटनकर यांनी उपस्थित मतदारांना मतदार जनजागृतीची शपथ यावेळी दिली. नागपूर यावेळेस 75 टक्के मतदान करून डिस्टिंक्शन मध्ये पास होईल असा विश्वास देखील अधिकाऱ्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी पोलिस आयुक्त डॉ.रवींद्र सिंघल, अतिरिक्त विभागीय आयुक्त डॉ.माधवी खोडे, सहायक जिल्हाधिकारी कुशल जैन आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

<u>हवामान</u>

नागपूर जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवस ०५ ते ०९ एप्रिल २०२४ दरम्यान आकाश आंशिक ते अंशतः ढगाळ राहण्याची अधिक शक्यता वर्तविण्यात आली आहे. ०७, ०८, आणि ०९ एप्रिल २०२४ रोजी तुरळक ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची अधिक शक्यता असल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे.

<u>पंतप्रधान दौरा</u>

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा येत्या 8 एप्रिल रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील मोरवा येथे प्रचार दौरा आयोजित करण्यात आला आहे. या सभेकरीता नागरिकांची मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्याकरिता उद्या 7 एप्रिल दुपारी 2 वाजता पासून ते 8 एप्रिलच्या रात्री 8 वाजेपर्यंत मोरवा विमानतळ पासून ते मोरवा टी- पॉईंट-पडोली चौक-वरोरा नाकापर्यंत तसेच मोरवा टी पॉईंट ते साखरवाही फाटा हे दोन्ही मार्ग नो पार्किंग व नो हॉकर्स झोन म्हणून घोषित करण्यात येत आहे.